दैनिक
# जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
Page 7
26 Jul 2024

# शिवभोजन थाळी योजनेतील एक केंद्र तृतीयपंथीयांना
## नागपूर येथे सामाजिक न्याय विभागाचा पुढाकार



**नागपूर** ■ दिलीप येवले
9890561241

राज्यातील तृतीयपंथीयांना असलेल्या घटनादत्त अधिकाराचे संरक्षण व्हावे, अधिक मुक्तपणे त्यांना विविध व्यवसायाची संधी मिळावी याचबरोबर शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहचाव्यात यासाठी सामाजिक न्याय विभाग कटीबद्ध आहे. याचबरोबर सर्व भेदापलीकडे माणूस म्हणून त्यांना सर्वांसोबत काम करण्याची संधी मिळावी या उदात्तहेतूने नागपूर येथे एका शिवभोजन थाळी केंद्राचे प्रातिनिधीक स्वरुपात संचालन करण्याची संधी जिल्हा प्रशासनाने त्यांना देऊ केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात नुकत्याच झालेल्या बैठकीत या निर्णयावर तृतीयपंथीयांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत शिक्कामोर्तब करण्यात आले.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनूप खांडे, सामाजिक न्याय विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, सारथी ट्रस्टच्यावतीने निकुंज जोशी व इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

तृतीयपंथींयाबाबत अजूनही सामाजिक न्यायाच्यादृष्टीने व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे. त्यांना वेळेवर वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, आवश्यक असणाऱ्या लसींची उपलब्धता व सुविधा निर्माण व्हावी, संजय गांधी निराधार योजनेसह इतर योजनांचा लाभ त्यांना मिळावा यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे संबंधीत विभागाशी समन्वय साधला जात आहे. प्रत्येक मेडीकल कॉलेजमध्ये त्यांच्यासाठी प्राधान्याने व्यवस्था व्हावी याबाबत नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी दिले. यादृष्टीने स्वतंत्र कॅम्प घेण्याबाबत त्यांनी सामाजिक न्याय विभागाला सांगितले.